उमेद

क्षितिज नवे, विश्वास नवा...

## खुली ई - निविदा

विविध प्रशिक्षणे/कार्यशाळा/बैठका/ चर्चासत्रे इत्यादी कार्यक्रमासाठी आवश्यक निवासी व अनिवासी प्रशिक्षण केंद्र सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एका वर्षासाठी सेवा पुरवठादार संस्था निवड करण्याबाबत

निविदा संदर्भ क्रमांक: एमएसआरएलएम/जि.अ.व्य.क.नांदेड/प्रशिक्षण केंद्र/-960/२०२३

ई- निविदा क्रमांक (ID) :

दिनांक:06.05./२०२३

-जारी कर्ता-

जिल्हा अभियान संचालक, (एमएसआरएलएम) तथा

मुख्य कार्यकारी अधिकारी,

जी. प.नांदेड

**१ ) ई- खुली निविदा (Bid) सादर करण्यासाठी निमंत्रण:-**

अ) दीन दयाल अंत्योदय योजना, हि योजना ग्रामीण भागातील गरीबी निर्मूलनासाठी भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने सुरू केलेली महत्वाकांक्षी योजना आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एम.एस.आर.एल.एम.उमेद) २०११ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एन.आर.एल.एम.)-आजीविका यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आली. गरिबांच्या शाश्वत जीवनशैलीचा मार्ग म्हणून कार्य करणाऱ्या समाजावर आधारित संस्था तयार करून त्यांची मजबुती करून महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील दारिद्र्य कमी करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. सदर अभियान नांदेड जिल्हात सन २०१८-१९ पासुन इंटेन्सिव पद्धतीने राबविण्यात येत आहे. उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष यांचे कार्यालय,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,जी.प. नांदेड येथे असून तालुकास्तरावर तालुका अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत काम करण्यात येते .

आ) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) च्या अंतर्गत जिल्हा व सर्व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत विविध स्तरावरील कर्मचारी, समूह संस्थांचे सदस्य व इतर व्यक्तींचे वर्षभर जिल्हा /तालुका/ग्रामस्तरावर विविध प्रशिक्षण/कार्यशाळा/ बैठकांचे आयोजन करण्यात येते. त्याकरिता **जिल्हा व तालुकास्तरावर विविध प्रशिक्षणे/कार्यशाळा/ बैठकी/ चर्चासत्रे इत्यादी कार्यक्रमासाठी प्रशिक्षण केंद्र व्यवस्था / सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एक सेवा पुरवठादार संस्थेची एक वर्षासाठी खुली ई-निविदा पद्धतीने निवड करण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहे.**

इ) सदरची निविदा दोन किंवा अधिक निविदा धारकांना एकत्रितरित्या सादर करता येणार नाही (Joint Venture/ Consortium)

ई) या सूचनेच्या प्रतिसादात आपली निविदा सादर करण्यापूर्वी निविदा धारकांना या निविदा दस्तऐवजाचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. या निविदेच्या प्रतिसादात जे निविदा सादर करतील त्यांनी या निविदा सूचनाचा काळजी पूर्वक अभ्यास आणि या दस्तऐवजाची तपासणी केल्यानंतर सर्व अटी, नियम त्यांचे परिणाम समजून घेतले असे मानले जाईल.

उ) सर्व पात्र व ईच्छुक निविदाधारकांनी निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा प्रणालीचा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.

ऊ) निविदाधारक (Bidder) यांनी त्यांचे तांत्रिक आणि आर्थिक प्रस्ताव (Bid) हेइलेक्ट्रॉनिक स्वरूपात ऑनलाइन सादर करणे आहे. निविदा शुल्क (Tender Fee) आणि बयाना ठेव (Earnest Money Deposit-EMD) निविदा दस्तऐवजात दिलेल्या तपशीलानुसार ऑनलाइन सादर करणे अनिवार्य आहे.

ऋ) कोणत्याही कारणामुळे निविदा ऑनलाइन सादर करण्यात कोणताही विलंब किंवा त्रुटीसाठी निविदा जारीकर्ता जबाबदार राहणार नाही. यासाठी, निविदा धारकांना विनंती केली जाते की,संपूर्ण आवश्यक निविदा दस्तऐवज (Bid Documents), आंतरजाळ (Internet) मंद गती किंवा इतर कोणत्याही अनपेक्षित समस्या टाळण्यासाठी आधीपासूनच दिलेल्या वेळेत ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे. निविदा (Bid) सादर करण्यासंबंधित काही अडचणी असल्यास निविदाधारकांनी https://mahatenders.gov.in या पोर्टल ला भेट देऊन माहिती घ्यावी.

**२. निविदेची वेळापत्रक खालील प्रमाणे राहील:-**

| माहिती | तपशील |
|---|---|
| निविदा संदर्भ क्रमांक | एमएसआरएलएम/जि.अ.व्य.क/नांदेड/प्रशिक्षणकेंद्र/-----/२०२३ |
| ई निविदा आयडी | |
| निविदा दस्तऐवज डाउनलोड सुरु होण्याची व सादर करण्याची दिनांक आणि वेळ | दिनांक:- 26/05/२०२३, वेळ : सकाळी 9.00 |
| निविदा दस्तऐवज (Bids) डाउनलोड व सादर करण्यासाठी अंतिम दिनांक आणि वेळ http://mahatenders.gov.in | दिनांक:-09/06/ २०२३, वेळ : सायंकाळी 5.00 |
| तांत्रिक निविदा उघडण्यासाठी दिनांक आणि वेळ | दिनांक:-12/06/२०२३, वेळ : सकाळी 11.00 |
| वित्तीय निविदा उघडण्यासाठी दिनांक आणि वेळ | दिनांक:-12/06/२०२३, वेळ : दुपारी 3.00 |
| संपर्कासाठी आणि निविदा उघडण्यासाठी ठिकाण | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,<br>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जी. प. नांदेड |

सूचना :

१. निविदा उघडण्याच्या ठराविक तारखेस खरेदीदारासाठी सुट्टी जाहीर केली असेल तर पुढील कामकाजाच्या दिवशी त्याच वेळेला व त्याच ठिकाणी निविदा उघडल्या जातील.

२. उपरोक्त दिनांक आणि वेळेमध्ये बदल होऊ शकतो तरी निविदा धारकानी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नमूद केलेल्या सर्व तारखा व वेळ ही अंतिम असेल. त्याकरिता निविदा धारकानी सदर संकेतस्थळावर वेळोवेळी पाहणी करावी.

३. निविदा संबंधित इतर महत्वाची माहिती:-

| अ. क्र. | माहिती | तपशील |
|---|---|---|
| १ | निविदा शुल्क (विना परतावा) | रु.१५०००/- मुळ रक्कम व GST १८% २७००/- असे एकुण रुपये१७७००/- निविदा सादर करताना ई-निविदा पोर्टलवर ऑनलाईन जमा भरावे लागतील. |
| २ | बयाना ठेव (Earnest Money Deposit EMD) (ऑनलाइन पैसे भरणे) | रु.१,५००००/- निविदा सादर करताना ई-निविदा पोर्टलवर ऑनलाईन भरावे लागतील. |
| ३ | बयाना EMD ठेव वैधता कालावधी | तांत्रिक निविदा उघडण्याच्या तारखेपासून ९० दिवस |
| ४ | कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) | |
| ५ | बँक गॅरंटी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात कामगिरी सुरक्षा रक्कम /अनामत रक्कम (Performance Security Deposit)देण्यासाठी अंतिम दिनांक | Letter of Acceptance प्राप्त झाल्यापासून एक आठवड्याच्या आत संबधित निविदाधारकाने कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) बँक गॅरंटी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात जमा करणे बंधनकारक आहे . त्याची वैधता करार पूर्ण झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत असेल. |

जिल्हा अभियान संचालक, (एमएसआरएलएम) तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जी. प.नांदेड

४. बयाना जमा (Earnest Money Deposit):-

अ) मुद्दा क्र. २ मध्ये उल्लेखित बयाना (Earnest Money Deposit) ऑनलाईन स्वरुपात जमा करणे अनिवार्य आहे.

आ) ज्या निविदादारांनी वर नमूद केल्याप्रमाणे आणि निर्धारित बयाना रक्कम(Earnest Money Deposit) जमा केलेले नाही त्यांची निविदा (Bid) नाकारली जाईल.

इ) अयशस्वी निविदाधारकाची बयाना रक्कम (Earnest Money Deposit) निविदा निश्चितीकरण झाल्यानंतर व यशस्वी/निवड करण्यात आलेल्या निविदाधारकाने कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम जमा केला नंतर किंवा निविदा व बयाना ठेव वैधता कालावधी यामध्ये जे अगोदर असेल त्यानुसार विना व्याज Online परत करण्यात येईल.

ई) यशस्वी निविदादाराचे बयाना (Earnest Money Deposit) जमा करार करण्यात आल्यानंतर आणि निश्चित कालावधीत बँक गॅरंटी / डिमांड ड्राफ्ट स्वरुपात कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) जमा केल्यानंतर आणि निविदा दस्तऐवजामध्ये नमूद केल्यानुसार परत केली जाईल.

उ) निविदा फी व इसारा रक्कम (EMD) रक्कमेचे online भरणा केलेली पावती स्कन प्रत व कागदपत्राच्या छायांकित प्रती दिनांक / /२०२३ रोजी -------------- वाजेपर्यंत MSRLM जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा ग्रामीण् विकास यंत्रणा, जी. प. नांदेड येथे समक्ष सादर करणे आवशयक आहे. त्या शिवाय ई निविदा वैद्य राहणार नाही.

५. बयाना रक्कम (Earnest Money Deposit) जप्ती -

अ) निविदाच्या वैधतेच्या कालावधीत निविदाधारक आपली निविदा परत घेत असेल किंवा निविदाच्या वैधतेच्या कालावधीत किंवा त्याच्या वाढीव कालावधीच्या दरम्यान निविदेचे मूल्य वाढवले तर बयाना रक्कम EMD(Earnest Money Deposit) जप्त करण्यात येईल.

आ) यशस्वी निविदाधारक निश्चित केलेल्या कालावधीत करारावर सही करण्यास अयशस्वी ठरला किंवा निविदा दस्तावेजात दिलेल्या नमुन्यानुसार निश्चित कालावधीत बँक गॅरंटी / डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपात कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम PSD (Performance Security Deposit) जमा करण्यास अयशस्वी ठरला तर बयाना रक्कम EMD (Earnest Money Deposit) जप्त करण्यात येईल.

इ) निविदा प्रक्रियेदरम्यान निविदा धारकाच्या विचारपूर्वक करण्यात आलेल्या चुकीच्या कृतीमुळे मूल्यांकन आणि अंतर्मीकरण प्रक्रियेत अनावश्यकपणे विलंब झाल्यास संबंधित निविदाधारकाची बयाना रक्कम (Earnest Money Deposit) जप्त करण्यात येईल. बयाना रक्कम EMD (Earnest Money Deposit) जप्त करण्याबाबत निविदा जारीकर्ता यांचा निर्णय अंतिम असेल आणि तो निविदाधारकांवर बंधनकारक असेल.

ई) जर निविदा प्रक्रियेदरम्यान निविदाधारकाने देण्यात आलेली कोणतीही माहिती चुकीची आढळली तर निविदा जारीकर्ता संबंधित निविदाधाकाची निविदा (Bid) रद्द करू शकतात व संबंधित निविदादारावर आवश्यक कार्यवाही करु शकतील. कोणत्याही कारणामुळे Bid स्विकारणे , नाकारणे अथवा रद करणे या बाबतचा अंतिम निर्णय जारीकर्ता यांचा असेल आणि तो निविदाधारकांवर बंधनकारक असेल. तसेच कोणत्याही कारणामुळे Bid प्रक्रिया रद झाल्यास कोणतीही रक्कम परत मिळणार नाही.

६. संपर्क तपशील:-

निविदा दस्तऐवज संबंधी कोणत्याही स्पष्टीकरण व संपर्कासाठी, निविदाधारकांना खाली प्रदान केलेल्या संपर्क माहितीवर संवाद साधता येईल.

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | पद | कार्यालय अधीक्षक तथा जिल्हा व्यवस्थापक(संपादणुक )<br>मो.क्र. ७५०७५९२१४६ |
| २ | कार्यालयीन पत्ता | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,<br>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, नांदेड<br>ई मेल आयडी:nanded@umed.in<br>कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२४६२-२३४१८४ |

७. निविदा बाबतची माहिती :-

निविदा निर्णय https://mahatenders.gov.in वर प्रकाशित केली जाईल. कोणत्याही दूरध्वनी / भ्रमणध्वणीव्दारे विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.

८. निविदा सादर करण्यापूर्वी ची विचारणा / शुल्क / निविदा करण्यासाठी दुरुस्तीस प्रतिसाद:-

निविदा जारी कर्ता कोणत्याही वेळेस,कोणत्याही कारणास्तव,स्वतःच्या पुढाकाराने किंवा निविदाधारकाव्दारे विनंती केलेल्या स्पष्टीकरणांच्या उत्तरदायित्वाच्या वेळेस (किंवा निविदा जारीकर्तने विस्तारित केलेल्या) किंवा आधी कोणत्याही वेळेस शुद्धीपत्रक जारी करुन निविदा दस्तावेजामध्ये बदल करू शकतो किंवा निविदाच्या तरतूदींच्या व्याख्या स्पष्ट करण्यासाठी अतिरिक्त सूचना निर्गमित करू शकतो. निविदा जारीकर्ता जारी केलेल्या निविदा दस्तऐवजातील दुरुस्ती / शुध्दिपत्रक https://mahatenders.gov.in वर प्रदर्शित केले जाईल आणि या निविदा दस्तऐवजात या संदर्भाव्दारे समाविष्ट केले जाईल असे मानले जाईल. अशा कोणत्याही दुरुस्ती सर्व निविदाधारकावर बंधनकारक असेल. संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या बदलांच्या आधारावर निविदा सूचना/ निविदा दस्तऐवज अद्ययावत करण्याच्या निविदाधारकाच्या अपयशामुळे या निविदा दस्तऐवजाच्या तरतुदींच्या कोणत्याही चुकीच्या अर्थासाठी निविदा जारीकर्ता जबाबदार राहणार नाही. शुध्दिपत्रक विचारात घेणे व त्या अनुषंगाने निविदाधारकांना त्यांची निविदा तयार करण्यासाठी उचित वाजवी कालावधी देण्यासाठी निविदा जारीकर्ता निविदा सादर करण्यासाठी अंतिम मुदत वाढवू शकतो अथवा कायम ठेवु शकेल. या बाबतचे सर्वस्वी अधिकारी जारीकर्ता यांचा असेल.

**९. प्रतिसाद पूर्णत्व:-**

अ) निविदाधारकांना निविदा दस्तऐवजात सर्व निर्देश, फॉर्म, अटी व शर्ती, आवश्यकता आणि इतर माहितीचा काळजीपूर्वक अभ्यास करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. निविदा दस्तावेज काळजीपूर्वक समजून घेतल्यानंतर आणि त्याचापूर्ण अर्थ समजून घेतल्यानंतर निविदा सादर करण्यात आलेली आहे असे मानले जाईल.

आ) या निविदाचा प्रतिसाद पूर्णतः असावा. निविदा दस्तावेजामध्ये नमूद आवश्यक सर्व माहिती सादर करण्यात अयशस्वी किंवा प्रत्येक बाबतीत निविदा दस्तऐवजास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद न देणाऱ्या निविदाधारकाची निविदा जोखमीमध्ये असेल आणि परिणामी त्याची निविदा नाकारली जाऊ शकते.

**१०. निविदा तयार करण्याचा खर्च:-**

निविदाधारकास निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी येणारा सर्व खर्च स्वतः करावयाचा आहे. निविदा जारीकर्ता कोणत्याही होणाऱ्या खर्चास जबाबदार राहणार नाही.

**११. राइट टू टर्मिनेशन:-**

निविदा जारीकर्ता कोणत्याही वेळी कोणत्याही कारणाशिवाय निविदा प्रक्रिया समाप्त करू शकतो. निविदा जारीकर्ता कोणतीही वचनबद्धता व्यक्त करीत नाही की या प्रक्रियेमुळे कोणाशीही व्यवसायातील व्यवहारावर परिणाम होईल. जर निविदा प्रक्रिया निरस्त करण्यात आली तर कोणत्याही व्याजाशिवाय सर्व निविदादारांचे बयाना ठेव EMD (Earnest Money Deposit) परत केले जाईल.

**१२ निविदामध्ये त्रुटी नसणे:-**

निविदेमध्ये कोणतीही त्रुटी नसणे आवश्यक आहे. कोणत्याही अधिलेखनाच्या / दुरुस्तीच्या बाबतीत, अधिकृत स्वाक्षरीकर्त्याव्दारे अधिलेखनाच्या / दुरुस्तीच्या जागेवर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

**१३ . निविदामध्ये सहभागी होण्यासाठी पात्रता अटी/निष्कर्ष :-**

निविदा सादर करण्याच्या दिनांकाला निविदाधारकला स्वतंत्रपणे खालील पात्रता निकष पूर्ण करणे अनिवार्य आहे.

क) मुंबई दुकान व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत शॉप अॅक्ट अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

ख) निविदाधारकाची मागील तीन आर्थिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२,२०२२-२०२३ मधील एकूण उलाढाल १०० लक्ष किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. सनदी लेखापाल यांचे टर्नओव्हर- सर्टिफिकेट जोडणे आवश्यक आहे.

ग) निविदाधारकाने किमान ५०० लोकांकरिता शासकीय, निम-शासकीय व खाजगी विभागासाठी घेतलेल्या निवासी प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण हॉल ,राहण्याची व जेवणाची व्यवस्था केल्याचा अनुभव असणे आवशक आहे .

घ) निविदाधारक वस्तू व सेवा कर (GST) अंतर्गत नोंदणीकृत असावा.

ङ) २०२२-२०२३ या वर्षाचे GST रिटर्न भरल्याची पावती असावी.

च) निविदाधारक निविदा सादर केल्याच्या तारखेपर्यंत कोणत्याही राज्य शासन किंवा केंद्र सरकार विभाग / केंद्रशासित प्रदेश / स्थानिक प्राधिकरणव्दारे काळीसूचीबद्ध किंवा बहिष्कृत केलेला नसावा.

छ) प्रशिक्षण वर्गाच्या आयोजनासाठी कोणत्याही प्रकारची अग्रिम रक्कम दिली जाणार नाही.

**१४. ऑनलाइन निविदा सादर करण्याबाबत:-**

निविदाधारक ई-निविदा संकेतस्थळ https://mahatenders.gov.in व्दारे ऑनलाईन निविदा सादर करणे आहे. सादर केलेल्या निविदामध्ये तांत्रिक आणि आर्थिक असे दोन लिफाफे समाविष्ट असतील. निविदाधारकाने निविदा दस्तऐवजात नमूद केलेले सर्व आवश्यक कागदपत्रे निविदासह आणि निर्धारित नमुन्यातच सादर केले पाहिजेत. आवश्यक कागदपत्रे सादर न करणे किंवा कागदपत्रे वेगवेगळ्या स्वरूपात सादर केल्यामुळे निविदा नाकारली जाऊ शकते. या निविदा दस्तऐवजाच्या प्रतिसादात सादर केलेली सर्व निविदा सर्व बाबतीत बिनशर्त असली पाहिजेत, नसल्यास निविदा जारी कर्त्याकडे निविदा नाकारण्याचा अधिकार सुरक्षित राहतो. निविदेचा भाग म्हणून सादर केलेल्या आवश्यक कागदपत्राचे प्रत्येक पृष्ठ मुद्रित केले गेले आहे आणि अधिकृत स्वाक्षरी कर्त्याव्दारे योग्यरित्या स्वाक्षरी केलेले आहे हे तपासण्यासाठी निविदाधारकाची जबाबदारी असेल. कोणत्याही कारणास्तव निविदा सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर निविदा सादर होणार नाही त्यामुळे इच्छुक निविदाधारकांनी शेवटच्या क्षणी निविदा सादर करणे टाळावे.

**अ.तांत्रिक लिफाफा:-**

इच्छुक निविदाधारकांनी खालील तांत्रिक कागदपत्रे ऑनलाइन सादर करणे आवश्यक आहे.

क) फॉर्म - १ प्रमाणे निविदा प्रपत्र/ फॉर्म.

ख) फॉर्म - २ मधील निविदाधारकाच्या व्यवसायाचा तपशील.

ग) फॉर्म-३ नुसार सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाउंटंट) यांचे तीन वितीय वर्ष २०२०-२१,२०२१-२२,२०२२-२०२३ चे (वैधानिक लेखा परीक्षण अहवाला आधारे) आर्थिक उलाढालीचे प्रमाणपत्र.

घ) सन २०२०-२१ व सन २०२१-२२, २०२२-२३ या तीन वर्षाचे इन्कम टॅक्स रिटर्न भरलेले कागदपत्र (Income Tax Return Document) सादर करणे बंधनकारक

ङ) मुंबई दुकान व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत शॉप ॲक्ट अंतर्गत नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र .

च) फॉर्म-५ –निविदाधारकाने किमान ५०० लोकांकरिता शासकीय, निम-शासकीयव खाजगी विभागासाठी घेतलेल्या निवासी प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण हॉल,राहण्याची व जेवणाची व्यवस्था केल्याचा अनुभव संदर्भातील संबधित कागद पत्रासह माहिती सादर करावे.

टीप- अनुभव असल्याबदल संबधित कार्यालयाचे कार्यादेशाची प्रत (त्यामध्ये प्रशिक्षणार्थी यांची संख्या नमूद असणे आवशक आहे ) व अनुभव प्रमाणपत्र किवा देयकाची प्रत (टॅक्स इनव्हाइस ) सादर करणे आवशक आहे.

छ) वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र

ज) २०२२-२०२३ या चालू वर्षाचे GST रिटर्न भरल्याची पावती.

झ) निविदा सादर करण्याच्या दिनांकापर्यंत सरकारी उपक्रम किंवा सरकारी संस्था, राज्य सरकार किंवा केंद्र सरकार विभाग / केंद्रशासित प्रदेश / स्थानिक प्राधिकरण / केंद्र आणि राज्य व्दारे काळया यादीत समाविष्ट नसल्याचे ५०० /- च्या गैर-न्यायिक मुद्रांक पेपर घोषणापत्र.

ञ) सर्व अटी निविदाधारकास बिनशर्त मंजूर असल्यास निविदाधारकाने निविदा स्पर्धेत भाग घ्यावा तसेच सर्व अटी मंजूर असल्याबाबत प्रतिज्ञापत्र Rs ५०० गैर-न्यायिक मुद्रांकवर तांत्रिक कागद पत्रसह अपलोड करणे बंधनकारक आहे.

**ब. आर्थिक लिफाफा:-**

- संकेत स्थळावरील निर्देशानुसार आर्थिक लिफाफा https://mahatenders.gov.in वर ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे.
- निविदा आणि स्वीकारलेले दर निश्चित कालावधीसाठी निविदाधारकास बंधनकारक असतील आणि कोणत्याही कारणाने करार कालावधी पूर्ण होईपर्यंत त्यात बदल केला जाणार नाही.

**१५. निविदा वैधता:-**

निविदा कलम ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीसाठी वैध असेल. त्यापेक्षा कमी कालावधीसाठी वैध असलेली निविदा नाकारली जाईल. अपवादात्मक परिस्थितीत निविदा जारीकर्ता त्यांच्या गरजेनुसार निविदेचा वैधता कालावधी वाढवण्याबाबत निविदाधारकांना विनंती करू शकतो. त्याची विनंती आणि प्रतिसाद लिखित किंवा ईमेलव्दारे केले जातील. निविदाधारक निविदा वैधता कालावधी वाढवण्याबाबत नकार देऊ शकतो परंतु अशा परिस्थितीत सदरच्या निविदाधारकास निवड प्रक्रियेतून काढून टाकले जाईल. परंतु,सदर निविदाधारकाची बयाना रक्कम जप्त करण्यात येणार नाही.

**१६. व्यावसायिक निविदा / वित्तीय निविदामध्ये त्रुटी/ सुधार:-**

निविदाधारकांना दर/ किंमत सादर करण्यास पुरेशी काळजी घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. निविदा जमा केल्याच्या शेवटच्या तारखेनंतर सादर केलेल्या आकडेवारीमध्ये कोणत्याही परीस्थितीत बदल होणार नाही. निविदेमध्ये अंकगणितीय त्रुटी असल्यास निविदा जारीकर्ता त्यामध्ये दुरुस्त करेल व ती निविदाधारकास बंधनकारक राहील.(एकूण केलेली बेरीज रक्कम चुकली असल्यास प्रती नग/युनिट दर ग्राह्य धरून त्यानुसार एकूण बेरीज करून येणारी रक्कम ग्राह्य धरली जाईल. तसेच अंक लिहण्यात चूक झाली असल्यास अक्षरात लिहलेली रक्कम ग्राह्य धरली जाईल.)

**१७. अपात्र निविदा:-**

ज्या निविदा खालील बाबींची पूर्तता करणार नाही ती निविदा असुसंगत निविदा म्हणून विचारात घेऊन अपात्र असेल.

अ) निविदा दस्तऐवजाच्या आवश्यकतांचे पालन करीत नाही.

आ) निविदा दस्तऐवजामध्ये विनंती केलेल्या विविध प्रारूपाचे (Format) चे पालन करत नाही.

इ) निविदा जारीकर्ताने निर्दिष्ट केलेल्या अहर्ता पूर्ण करत नसेल.

ई) निविदाधारकाने निविदा सादर करताना सर्व पात्रता अटींची पूर्तता केली नसल्यास.

उ) निविदेच्या वैधतेदरम्यान किंवा त्याच्या वाढीव कालावधी दरम्यान निविदाधारक सदर किंमती वाढवेल.

ऊ) निविदाधारक स्वत: च्या अटीसह निविदा सादर करेल.

ऋ) निविदा अपूर्ण स्वरूपात प्राप्त झाली असेल.

ऌ) तांत्रिक लिफाफ्यामध्ये अनपेक्षितपणे, अनावश्यकपणे, कराराच्या प्रक्रियेदरम्यान किंवा कराराच्या कार्यकाळात किंवा कराराच्या विस्तार कालावधीमध्ये चुकीची माहिती सादर करण्यात आली असेल.

ऍ) निविदा प्रक्रियेदरम्यान कोणत्याही वेळी बेकायदेशीर / भ्रष्ट / फसव्या अर्थाने निविदामूल्यांकनाची प्रक्रिया प्रभावित करण्याचा प्रयत्न केला असेल.

ऎ) जर एखादा निविदाधारक एकापेक्षा अधिक निविदा सादर करेल किंवा दोन किंवा अधिक निविदादारांमध्ये सामान्य स्वारस्य (common interests) आढळल्यास, निविदाधारकांना अयोग्य घोषित केले जाण्याची शक्यता असेल.

ए) निविदा जारी कर्त्यांव्दारे निर्दिष्ट अनुसार निविदाधारक बँक गॅरंटी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपात कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम (Performance Security Deposit) विहित मुदतीत जमा करण्यात अयशस्वी ठरला किंवा विहित मुदतीत करार करून घेण्यास अयशस्वी ठरला.

ऐ) निविदेच्या संदर्भातील कुठल्याही प्रकारचे प्रचार / प्रभाव / चौकशी अयोग्यता मानली जाईल. निविदेचे मुल्यांकन करताना निविदा जारी कर्त्याच्या असे ज्ञानात आले कि काही निविदादारांनी एकत्रित येऊन गठबंधन केल्यामुळे निविदेच्या प्रक्रियेस विलंब झाला असे निविदाधारक तसे करण्यास जबाबदार असतील व ते या करारासाठी तसेच निविदा जारी कर्त्याने जारी केलेल्या कोणत्याही निविदेमध्ये भाग घेण्यापासून पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी अपात्र असतील.

ऑ) जर तांत्रिक लिफाफ्यामध्ये किंमत, किंमत धोरण, मूल्यमापन यंत्रणा किंवा निविदेच्या व्यावसायिक पैलूबद्दल सूचित केलेली कोणतीही माहिती असेल.

**१८. निविदा उघडणे आणि मूल्यांकन प्रक्रिया:-**

**अ. तांत्रिक निविदाउघडणे:-:-**

तांत्रिक लिफाफे निश्चित केलेल्या वेळेस online उघडले जाईल.

**तांत्रिक दस्तऐवज तपासणी/मुल्यांकन :-**

तांत्रिक निविदेचे मूल्यांकन खालील प्रकारे केले जाईल:

अ) निविदादारांची तांत्रिक निविदाची तपासणी/मुल्यांकन कलम १३ मध्ये नमूद केलेल्या पात्रता निकषानुसार केले जाईल.

आ) कोणत्याही वेळी निविदा तपासणी प्रक्रियेदरम्यान निविदा जारीकर्ता निविदाधारकांकडून मौखिक / लिखित स्पष्टीकरण घेऊ शकेल. निविदा जारीकर्ता मुल्यांकन प्रक्रियेत त्यांच्या व्यावसायिक तज्ञांकडून सल्ला घेऊ शकेल. निविदा जारीकर्ता किंवा अधिकृत प्रतिनिधींना कोणताही निर्णय घेण्यापूर्वी निविदा सादर करणाऱ्या निविदादारांची उत्पादन / सेवा केंद्र तपासण्याचा अधिकार आहे.

इ) निविदादाराद्वारे नमूद केलेल्या मागील अनुभवाची संदर्भ तपासणी करण्याचा निविदा जारीकर्ताला अधिकार आहे. तपासणीदरम्यान मिळालेला कोणताही अभिप्राय तांत्रिक मूल्यांकन प्रक्रियेत विचारात घेतला जाईल.

ई) जे निविदाधारक निविदेमध्ये नमूद केलेल्या पात्रता अटींची पूर्तता करतील ते तांत्रिकदृष्ट्या प्रात्र असतील.

उ) तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाधारकांचे व्यावसायिक लिफाफे उघडण्यात येतील पात्रतेबाबत जारीकर्ता यांचा निर्णय अंतिम राहील.

**ब. व्यावसायिक / आर्थिक लिफाफे उघडणे:-**

तांत्रिकदृष्ट्या पात्र निविदाधारकाची व्यावसायिक/आर्थिक लिफाफा ई-निविदा प्रक्रियेनुसार online उघडले जाईल. व्यावसायिक निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ पात्र निविदाधारकांना online पोर्टल द्वारे कळविण्यात येईल. याबाबत निविदाधारकाने वेळोवेळी पोर्टलला भेट देणे आवश्यक असेल.

**१९. निवड निकष:-**

- निविदा जारीकर्ता सोबतच्या परिशिष्ट अ प्रमाणे जिल्हा निवासी , जिल्हा अनिवासी व तालुका निवासी , तालुका अनिवासी सेवा सुविधेचे पॅकेजचे दर निश्चित करताना एका पुरवठादाराची निवड करण्याच्या अनुषंगाने उपरोक्त नमूद चारही प्रकाराच्या दराचे एकत्रित बेरीज करुन ज्या पुरवठादाराचे दर सर्वांत न्यूनतम असतील अशा एका पुरवठाधारकाची निवड अंतिम करण्यात येईल. तथापी जिल्हा निवासी , जिल्हा अनिवासी व तालुका निवासी , तालुका अनिवासी आशा चारही प्रकारच्या प्रशिक्षणाचे दर वेगवेगळे नमुद करणे आवश्यक आहे.

- जर करार कालावधीत कोणत्याही वेळी निविदा सेवासाठीची किंमत केंद्रीय किंवा राज्य सरकारच्या कोणत्याही कायद्याच्या किंवा अधिनियमाव्दारे कमी केली गेली असेल,तर निविदाकाराला नैतिक आणि वैधानिकदृष्ट्या करार केलेल्या किमती कमी होण्याबाबतची माहिती तावडतोब निविदा जारी कर्त्याने खरेदीदाराला सांगणे बंधनकारक असेल. त्यानुसार दर कमी करण्याचा अधिकार जारी कर्त्याला असेल.

**२०.कोणतीही निविदा स्वीकारण्याचा आणि कोणत्याही किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार:-**

कोणतीही निविदा स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार आणि करार करण्याआधी निविदा प्रक्रिया रद्द करण्याच्या आणि कोणत्याही वेळी कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा रद्द करण्याचाअधिकार कोणत्याही दायित्वाविना निविदा जारी कर्त्याकडे राखून ठेवला आहे.

**२१. निवडीची अधिसूचना:-**

अ) निविदा वैधता कालावधी संपण्यापूर्वी निविदा जारीकर्ता यशस्वी निविदाधारकांना नोंदणीकृत पोस्टव्दारे किंवा ईमेलव्दारे सूचित करेल तसेच त्यामध्ये आवश्यक तपशील, वर्णन, सेवा आणि संबंधित स्वीकारलेल्या किमतीं बाबत थोडक्यात माहिती दर्शविल. तसेच निविदा जारीकर्ता निविदा स्वीकारल्याबाबतचे स्वीकार पत्र (Letter of Acceptance) जारी करेल.

आ) स्वीकार पत्र (Letter of Acceptance) प्राप्त झाल्यानंतर यशस्वी निविदाधारक बँक गॅरंटी किंवा डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात आवश्यक असल्यास आवश्यक कामगिरी सुरक्षा रक्कम / अनामत रक्कम PSD (Performance Security Deposit) तसेच निर्धारित केलेल्या नमुन्यात करार विहित मुदतीत सादर करेल अन्यथा बयाना ठेव EMD (Earnest Money Deposit) जप्त होईल आणि स्वीकार पत्र/पुरवठा आदेश रद्द करण्यात येईल.

इ) स्वीकार पत्र / पुरवठा आदेशाची अधिसूचना म्हणजे करार होय.

**२२. करार कालावधी:-**

करार हा सुरुवातीस एक वर्षाच्या कालावधीसाठी असेल आणि समाधानकारक कामगिरीच्या अधीन राहून पुढील १ वर्षाच्या कालावधीसाठी जिल्हा अभियान संचालक, तथा मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान नांदेड हे त्याच अटी व शर्तींवर किंवा काही अटी व शर्ती जोडून/ हटवून/ सुधारणेसह वाढविला जाऊ शकेल. तथापी निविदा जारीकर्ता निर्धारित करार एका महिन्याची नोटीस देऊन कोणत्याही कारणास्तव/कारणाविना करार रद्द करण्यात येईल.

**२३. करार:-**

ज्यांची निविदा स्वीकारली गेली असेल,असे यशस्वी निविदादाराला विहित मुदतीत रु. ५०० /- (निविदाधारक मुद्रांक शुल्क खर्च करेल) च्या गैर न्यायिक मुद्रांक कागदावर करार करावा लागेल.

**२४. कामगिरी सुरक्षा ठेव:-**

यशस्वी निविदाधारक स्वत: च्या खर्चाने नमूद केलेली कामगिरी सुरक्षा ठेव डिमांड ड्राफ्ट किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात कामगिरी सुरक्षा ठेव (Performance Security) निविदा जारीकर्ताकडे जमा करेल.

निविदा जारीकर्ता खालील कारणास्तव कामगिरी सुरक्षा ठेव (Performance Security) मधून वसूली करण्यास पात्र असेल.

अ) निविदादाराव्दारे अनियमिततेसाठी दंड म्हणून लावलेली कोणतीही रक्कम.

आ) निविदा जारीकर्ता कोणत्याही निविदाधारक किंवा त्याच्या कोणताही अभिकर्ता / कर्मचारी किंवा कर्मचा-यांचे कोणत्याही डीफॉल्टच्या आधारावर सरकारी / तृतीय पक्षाला जबाबदार असेल अशी कोणतीही रक्कम.

इ) कोणत्याही न्यायालय / ग्राहक मंच किंवा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सी किंवा त्यांच्या वतीने काम करणाऱ्या व्यक्तीच्या आदेश / निर्णयाखाली केलेले कोणतेही देयक / दंड.

ई) इतर कोणत्याही थकबाकी रक्कम.

या कलमाखाली रक्कम वसूल झाल्यानंतर,निविदाधारक निविदा जारीकर्ता कडे १५ दिवसांच्या आत रकमेच्या मर्यादेपर्यंत परतफेड करेल असे न केल्यास तो कराराचा भंग मानला जाईल आणि तो संपुष्टात येऊ शकतो. अशास्थितीत व्याजमुक्त कामगिरी सुरक्षा ठेव (Performance Security) सहित सर्व रकमेची जप्ती करण्यात येईल.

२५. दंड:-

कामकाजाच्या व्याप्ती (Scope of Work) मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती पूर्ण करण्यासाठी निविदाधारक अयशस्वी ठरल्यास प्रती प्रसंग रुपये ५०००/- (रु. पाच हजार फक्त) दंड आकारण्यात येईल.

**२६. देयक अदा करण्याबाबत अटी:-**

निर्धारित केलेल्या अधिकारी यांनी योग्यरित्या स्वाक्षरी केलेल्या सहभागी सूची (Attendance Sheet) व्दारे समर्पित देयक (Tax Invoice) सादर केल्याच्या दिनांकापासून दोन आठवड्यांत देय रक्कम GST रक्कम सह अदा केली जाईल.

**२७. आवश्यक बाबींचा विवरण आणि कामाची व्याप्ती:-** कृपया परिशिष्ट अ पाहावे

**जिल्हा अभियान संचालक, (एमएसआरएलएम) तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जी. प.नांदेड**

सोबत:

१. परिशिष्ट अ
२. फॉर्म नंबर १ ते ६

**परिशिष्ट-अ**

नांदेड जिल्हा व सर्व तालुका स्तरावर विविध प्रशिक्षण/कार्यशाळा/ बैठकी / चर्चासत्रे इ. चे आयोजन करण्यासाठी एक वर्षासाठी खालील सेवेसाठी सेवा पुरवठादार यांची निवड करणे आहे. (नांदेड जिल्यातील सर्व तालुक्यामध्ये प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते.)

**१) पॅकेज – १ : जिल्हा स्तरावर निवासी (प्रशिक्षण /कार्यशाळा) :**

| अ.क्र. | विवरण | सुविधा / आवश्यकता |
|---|---|---|
| १. | प्रशिक्षण कक्ष नॉन एसी (८ ते १० तास) | १. कमीत कमी आसन क्षमता ५० व्यक्ती<br>२. प्रोजेक्टर स्क्रीन गृह<br>३. माईक साऊंड सिस्टम<br>४. चार्ट पेपर व स्केच पेन<br>५. व्हाईट बोर्ड विविध रंगातील पेनसह<br>६. लाईट गेल्यास इतर पर्यायी व्यवस्था<br>७. पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह |
| २. | निवास व्यवस्था नॉन एसी | १. प्रत्येक व्यक्तीस स्वतंत्र पलंग/कॉट,चादर सह गादी, उशी , पांघरण्याची चादर, मच्छरदाणी इत्यादी<br>२. अंघोळीसाठी गरम पाणी<br>३. पिण्यास शुध्द पाणी |

| | | |
|---|---|---|
| | | ४. एका रुम मध्ये जास्तीत जास्त ३ ते ४ व्यक्ती ठेवता येतील.<br>५. प्रत्येक रुम मध्ये स्नानगृह व शौचालय असणे आवश्यक. |
| ३. | सकाळचा नाष्टा (अमर्यादित) | १. इडली सांबर/पोहा/उपमा/डोसा/पुरी/भाजी/पराठा इ.<br>२. चहा व कॉफी |
| ४. | दिवस व रात्रीचे जेवण<br>टीप:<br>१. सकाळी असलेली कोणतीही भाजी रात्री किंवा दुसऱ्या दिवशी असणार नाही<br>२. दोन दिवसातून एक वेळ मांसाहार देणे बंधनकारक आहे | अमर्यादित भोजनमध्ये खालील पदार्थ आवश्यक आहे.<br>१. रोटी / चपाती/ भाकरी<br>२. डाळ फ्राय/ तडका<br>३. एक सुक्की भाजी<br>४. एक पातळ वरण<br>५. भात- वरण<br>६. पापड, लोणचे<br>७. मर्यादीत एक गोड पदार्थ |
| ५. | प्रशिक्षण दरम्यान चहा व कॉफी | दर दिवशी सकाळी ११.३० व संध्याकाळी ४.३० वाजता |

२) पॅकेज – २: जिल्हास्तरावर अनिवासी (प्रशिक्षण /कार्यशाळा):

| अ.क्र. | विवरण | सुविधा / आवश्यकता |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षण कक्ष नॉन एसी ( ८ ते १० तास ) | १. कमीत कमी आसन क्षमता 50 व्यक्ती<br>२. प्रोजेक्टर स्क्रीन गृह<br>३. माईक साऊंड सिस्टम<br>४. चार्ट पेपर व स्केच पेन<br>५. व्हाईट बोर्ड विविध रंगातील पेनसह<br>६. लाईट गेल्यास इतर पर्यायी व्यवस्था<br>७. पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह |
| २ | सकाळचा नाष्टा (अमर्यादित) | १. इडली सांबर/पोहा/उपमा/डोसा/पुरी/भाजी/पराठा इ.<br>२. चहा व कॉफी |
| ३ | दिवसाचे जेवण | अमर्यादित भोजनमध्ये खालील पदार्थ आवश्यक आहे.<br>१. रोटी / चपाती/ भाकरी<br>२. डाळ फ्राय/ तडका<br>३. एक सुक्की भाजी<br>४. एक पातळ वरण<br>५. भात- वरण<br>६. पापड, लोणचे |

| | | |
|---|---|---|
| | | ७. मर्यादीत एक गोड पदार्थ |
| ४. | प्रशिक्षण दरम्यान चहा व कॉफी | दर दिवशी सकाळी ११.३० व संध्याकाळी ४.३० वाजता |

३) पॅकेज – ३ : तालुकास्तरावर निवासी (प्रशिक्षण /कार्यशाळा):

| अ.क्र. | विवरण | सुविधा / आवश्यकता |
|---|---|---|
| १. | प्रशिक्षण कक्ष नॉन एसी ( ८ ते १० तास ) | १. कमीत कमी आसन क्षमता ५० व्यक्ती<br>२. प्रोजेक्टर स्क्रीन गृह<br>३. माईक साऊंड सिस्टम<br>४. चार्ट पेपर व स्केच पेन<br>५. व्हाईट बोर्ड विविध रंगातील पेनसह<br>६. लाईट गेल्यास इतर पर्यायी व्यवस्था<br>७. पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह |
| २. | निवास व्यवस्था नॉन एसी | १. प्रत्येक व्यक्तीस स्वतंत्र पलंग/कॉट,चादर सह गादी, उशी , पाघरण्याची चादर, मच्छरदाणी इत्यादी<br>२. अंघोळीसाठी गरम पाणी<br>३. पिण्यास शुध्द पाणी<br>४. एका रुम मध्ये जास्तीत जास्त ३ ते ४ व्यक्ती ठेवता येतील.<br>५. प्रत्येक रुम मध्ये स्नानगृह व शौचालय असणे आवश्यक. |
| ३. | सकाळचा नाष्टा (अमर्यादित) | १. इडली सांबर/पोहा/उपमा/डोसा/पुरी/भाजी/पराटा इ.<br>२. चहा व कॉफी |
| ४. | दिवस व रात्रीचे जेवण<br>टीप:<br>१. सकाळी असलेली कोणतीही भाजी रात्री किंवा दुसऱ्या दिवशी असणार नाही<br>२. दोन दिवसातून एक वेळ मांसाहार देणे बंधनकारक आहे | अमर्यादित भोजनमध्ये खालील पदार्थ आवश्यक आहे.<br>१. रोटी / चपाती/ भाकरी<br>२. डाळ फ्राय/ तडका<br>३. एक सुक्की भाजी<br>४. एक पातळ वरण<br>५. भात- वरण<br>६. पापड, लोणचे<br>७. मर्यादीत एक गोड पदार्थ |
| ५. | प्रशिक्षण दरम्यान चहा व कॉफी | दर दिवशी सकाळी ११.३० व संध्याकाळी ४.३० वाजता |

४ ) पॅकेज – ४ : तालुका स्तरावर अनिवासी (प्रशिक्षण /कार्यशाळा):

| अ.क्र. | विवरण | सुविधा / आवश्यकता |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षण कक्ष नॉन एसी ( ८ ते १० तास ) | १. कमीत कमी आसन क्षमता ५० व्यक्ती<br>२. प्रोजेक्टर स्क्रीन गृह |

| | | |
|---|---|---|
| | | ३. माईक साउंड सिस्टम<br>४. चार्ट पेपर व स्केच पेन<br>५. व्हाईट बोर्ड विविध रंगातील पेनसह<br>६. लाईट गेल्यास इतर पर्यायी व्यवस्था<br>७. पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह |
| २ | सकाळचा नाश्ता (अमर्यादित) | १. इडली सांबर ,पोहे ,शिरा ,उपमा , डोसा,पुरी भाजी,पराठा इ.<br>२. चहा व कॉफी |
| ३ | दिवसाचे जेवण | अमर्यादित भोजनमध्ये खालील पदार्थ आवश्यक आहे.<br>१. रोटी / चपाती/ भाकरी<br>२. डाळ फ्राय/ तडका<br>३. एक सुक्की भाजी<br>४. एक पातळ वरण<br>५. भात- वरण<br>६. पापड, लोणचे<br>७. मर्यादीत एक गोड पदार्थ |
| ४. | प्रशिक्षण दरम्यान चहा व कॉफी | दर दिवशी सकाळी ११.३० व संध्याकाळी ४.३० वाजता |

इतर अटी व शर्ती:-

१. जिल्हयासाठी एक प्रशिक्षण समन्वयक नियुक्त करणे बंधनकारक आहे.

२. एका वेळेस एका पेक्षा जास्त प्रशिक्षण घेणे आवश्यक असल्यास तशी व्यवस्था उपलब्ध करुन द्यावे लागतील.

३. प्रत्येक प्रशिक्षण / कार्यशाळेसाठी प्रत्येक उपस्थित व्यक्तीस रायटींग पॅड , पेन, फलेक्स इत्यादी वस्तु विनामुल्य देणे बंधनकारक आहे.

४. अभियानाचे संबंधित व्यवस्थापक महिन्याचा प्रशिक्षणाचा कार्यक्रम देईल त्यानुसार प्रशिक्षण केंद्र उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. तसेच वेळोवेळी दिलेल्या सुचना प्रमाणे जिल्हास्तरावर व तालुका स्तरावर प्रशिक्षण केंद्र सर्व सोयीसुविधासह उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

५. प्रशिक्षण केंद्र स्वच्छ, सुरक्षित स्थितीत असणे आवश्यक आहे.

६. मद्य व्यवसाय/विक्री करणा-या ठिकाणचे प्रशिक्षण केंद्र किंवा राहण्याची सोय करता येणार नाही.

७. शासकीय सर्व नियमांचे / कायद्याचे पालन करणे बंधनकारक आहे

८. सर्व प्रशिक्षण केंद्राला/राहण्याची सोय असलेल्या ठिकाणी अन्न व औषध प्रशासनाने जारी केलेले परवाने असणे बंधनकारक आहे.

९. पुरवठादाराच्या देयकातुन नियमानुसार कर कपात करण्यात येईल.

१०. कोणत्याही कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत आगाऊ पैसे दिले जाणार नाहीत.

११. अटीच्या किंवा परिस्थितीत व्याख्या करण्याच्या बाबतीत कोणत्याही विवाद प्रकरणात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष संबंधित च्या नामित पदाधिका-याकडुन योग्य सुचना मिळतील. आणि त्यानुसार निवडलेल्या निविदादाराला निविदामध्ये नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार त्वरित

सेवा पुरवावी लागेल.

१२. आग नियंत्रक उपकरणे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

१३. प्रशिक्षण कालावधी दरम्यान सुरक्षा रक्षक पुरेसे उपलब्ध असले पाहिजे.

१४. पुरुष आणि स्त्रियांसाठी स्वतंत्र शौचालये उपलब्ध असणे गरजेचे आहे.

१५. प्रशिक्षण केंद्र व निवास व्यवस्था एकाच टीकाणी असणे आवश्यक आहे.

१६. प्रशिक्षण केंद्र व निविदा व्यवस्था असलेली इमारतीचा छत पत्र्याचा चालणार नाही.

१७. प्रशिक्षण केंद्र, निवास व्यवस्था, जेवणाची व्यवस्था व इतर बाबी नमुद केल्याप्रमाणे नसल्यास करार तात्काळ रदद करुन सुरक्षा ठेव जप्त करुन शासनाच्या काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल.

१८. इतर अटी व शर्ती निविदा मध्ये तसेच शुध्दीपत्रकात नमुद केल्यानुसार राहतील.

१९. वेळोवेळी शासन स्तरावरुन निर्गमित केलेले परिपत्रक व सुचनेनुसार प्रशिक्षणाचे दर कमी अथवा वाढ करणे या बाबत सर्वस्वी अधिकारी निविदा जारीकर्ता यांना राहतील.

२०. स्थानिक सेवा पुरवठादार यांना प्राधान्य देण्यात येईल.

२१. सन 2023-24 या वर्षातील राज्य कक्षाच्या प्राप्त उदीष्टाप्रमाणे प्रशिक्षणाचे आयोजन करावयाचे अथवा नाही या बाबत सर्वस्वी अधिकार जारीकर्ता यांना असेल. या बाबत कुठलाही दावा करता येणार नाही.

२२. निवड झालेल्या सेवा पुरवठाधारक यांची सेवा व सुविधा पुरवठा करण्याची सर्वस्वी जबाबदारी असुन वेळोवेळी दिलेल्या सुचनेचे पालन करुन सेवा पुरवठा करणे अनिवार्य आहे. त्यासाठी वेगळे शुल्क मिळणार नाही.

**टीप:**१.निविदाधारकानी निविदा सादर करताना जिल्हास्तरीय पॅकेज व तालुकास्तरीय पॅकेजसाठी दर सादर करणे आवश्यक आहे.

२.निवीदा प्रपत्रामध्ये जिल्हास्तर व तालुकास्तरीय प्रशिक्षणाकरिता दर मागणी केली असुन, जिल्हास्तरीय व तालुका स्तरिय दराची एकत्रीत बेरीज करुन सेवा पुरवठादाराची निवड करण्यात येईल. जिल्हा व तालुकास्तरीय प्रशिक्षणाकरिता वेगवेगळे पुरवठादार निवड करण्यात येणार नाही. (पॅकेज १ ते ४ चे दर एकत्रीत करुन सेवापुरवठादाराची निवड करण्यात येईल.)

३.नांदेड तालुका मुख्यालय असल्याने, सदर तालुक्याकरिता मुख्यालय स्तरावर प्रशिक्षण असल्यास जिल्हास्तरीय दर लागु राहतील.

**जिल्हा अभियान संचालक, (एमएसआरएलएम) तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जी. प.नांदेड**

फॉर्म -१ (Bid Form-1)

निविदा फॉर्म

(निविदाधारकाच्या लेटर हेडवर सादर करणे)

प्रति,
मा. जिल्हा अभियान संचालक, (एमएसआरएलएम) तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जी. प.नांदेड
नांदेड- ४३१६०१

माननीय महोदय,

निविदा दस्तऐवजाची तपासणी करून, आम्ही खालील स्वाक्षरी करणारे पावती देतो कि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत विविध प्रशिक्षणे/कार्यशाळा/ बैठकी / चर्चासत्रे इत्यादी कार्यक्रमासाठी आवश्यक जिल्हा व तालुकास्तरीय निवासी आणि अनिवासी प्रशिक्षण केंद्र व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी एका वर्षासाठी सेवा पुरवठादार संस्था निवड करण्यासाठी निविदा सादर करत असून आमची निविदा उपरोक्त नामांकित निविदा दस्तऐवजाशी पूर्ण सुसंगत आहे आणि लिफाफा क्रमांक ब मध्ये सादर केलेल्या किमती आमच्या व्यावसायिक लिफाफा या निविदेचा भाग बनलेला आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,नांदेड अंतर्गतजिल्हा आणि तालुकास्तरीय विविध प्रशिक्षणे/कार्यशाळा/ बैठकी / चर्चासत्रे इ. कार्यक्रमासाठी आवश्यक जिल्हा व तालुकास्तरीय निवासी आणि अनिवासी प्रशिक्षण केंद्र व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी एका वर्षासाठी सेवा पुरवठादार संस्था निवड करण्याबावत निविदा स्विकारण्यात आल्यास निविदा दस्तऐवजात नमूद केलेली सेवा पुरवठा करण्याचे आम्ही स्वीकार करत आहोत . आमच्या निविदा स्वीकारल्या गेल्यास, आम्ही कामगिरी सुरक्षा रक्कम /अनामत रक्कम (Performance Security Deposit) निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या निर्धारित वेळेत सादर करू.निविदा दस्तऐवजात निर्दिष्ट निविदा वैधता कालावधीसाठी आम्ही या निविदाचे पालन करण्यास सहमत आहोत आणि ते आमच्यावर बंधनकारक राहील आणि त्या कालावधीच्या समाप्तीपूर्वी कोणत्याही वेळी आपण आमची निविदा स्विकारू शकता. औपचारिक अंतिम करार तयार होईपर्यंत आणि आमच्याद्वारे अंमलात येईपर्यंत, निविदाधारकाची लिखित स्वीकृती आणि निविदा स्वीकारासह ही निविदा आपल्यादरम्यान बंधनकारक करार तयार करेल. आम्ही समजतो की आपल्याला प्राप्त होणारी सर्वात कमी किमतीची निविदा किंवा कोणतीही निविदा आपण स्वीकारण्याकरिता बांधील नाही .

स्वाक्षरी -------------------------------

तारीख:

च्या क्षमतेत:

सही करण्यासाठी अधिकृत किंवा अधिकृत व्यक्तीच्या वतीने
निविदादाराचे स्वाक्षरी आणि शिक्का

**फॉर्म - २ (Bidders Information : Form-2)**

निविदाधारक माहिती

| तपशील | तपशील |
| --- | --- |
| निविदादाराचे नाव | |
| टेलिफोन आणि ईमेल आयडीसह पूर्ण पत्ता | |
| निविदेशी संबंधित संपर्क तपशील<br>नाव आणि संपर्क तपशील | |
| व्यवसायाच्या स्थापनेचे वर्ष | |
| निविदाधारकाची स्थिती ( वैयक्तिक / मालकी / भागीदारी / खाजगी मर्यादित / सोसायटी इ. | |
| पॅन क्रमांक (PAN No.) | |
| वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी क्रमांक | |
| आर्थिक वर्षातील वार्षिक उलाढाल<br>२०२०-२१<br>२०२१-२२<br>२०२२-२३ | |
| शासकीय /निम शासकीय/महामंडळे / इतर शासकीय संस्था कार्यालयास प्रशिक्षण केंद्र उपलब्ध करून दिलेल्या कार्यालयांची नावे | |

निविदादाराचे स्वाक्षरी आणि शिक्का

FORM -3

**Format for submission of Turnover certificate on CA firms letter head**

**TO WHOMSOEVER IT MAY CONCERN**

This is to certify that M/s. (name of bidders firm) is having registered office at (detailed office address of bidder). The turnover of M/s. (Name of bidders firm) for the three financial years based on Audited Statement is as under

| Sr. No. | Financial Year | Turnover in lakhs |
|---|---|---|
| १ | २०२०-२१ | |
| २ | २०२१-२२ | |
| ३ | २०२२-२३ | |
| Total Turnover | | |

Signature of the Chartered Accountant

Name of the Firm:

Registration No.

Date:

Place:

(Seal of the Chartered Accountant)

फॉर्म-४ ( Financial bid format Form-4)
व्यवसायिक (आर्थिक)निविदा चे प्रपत्र (online only)

संकेत स्थळावरील निर्देशानुसार वित्तीय लखोटा https://mahatenders.gov.in वर ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे. (online only)

## फॉर्म -५
## (Form-5 Experince Details)

शासकीय विभागासाठी घेतलेल्या निवासी प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण हॉल, राहण्याची व जेवणाची व्यवस्था केल्याचा अनुभव असणे आवशक आहे पुरविल्याचा अनुभवाचा तपशिल

| अ क्र. | शासकीय/ निम शासकीय / महामंडळे इतर / शासकीयविभागा चे नाव | निवासी प्रशिक्षण व्यवस्था केलेला जिल्हा /तालुका | पुरवठा आदेश देणाऱ्या कार्यालयाचे नाव व पत्ता | पुरवठा आदेश /करार क्र. वतारीख | निवासी प्रशिक्षणार्थी/सहभागी व्यक्तींची संख्या | निवासी प्रशिक्षण कालावधी | सेवा करण्यात आलेली एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

निविदाधारकाची अधिकृत स्वाक्षरी
**Signature and seal of the Bidder**

टीप:

१. निविदा मध्ये नमूद केलेल्या पात्रता अटीच्या नुसार माहितीसादर करणे बंधनकारक आहे.
२. वरील माहितीच्या अनुषंगाने संबधित कार्यालयाचा १) संबधित कार्यालयाच्या आदेशाच्या प्रती ( प्रशिक्षणार्थी संख्या नमूद
असणे आवशक) /कराराची प्रत व २) प्रशिक्षण/ सेवा पूर्ण झाल्यानंतर कार्यालास देण्यात आलेल्या देयकाच्या प्रती ( tax invoice) किंवा संबधित प्रशिक्षण व्यवस्था व्यवस्थित पूर्ण केल्याचे संबधित विभागाचे प्रमाणपत्र अपलोड करणे आवशक
आहे अन्यथा निविदा नाकारण्यात येईल.

फॉर्म -६

घोषणा पत्र (Declaration)

( रु. ५००/- च्या गैर-न्यायिक मुद्रांक पेपरवर )

मी/आम्ही.....................................................व्यवसायाचेनाव
..........................................................................................व्यवसायाचा
पत्ता...........................................................................................................................................................
.................. जाहीर करतो कि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, नांदेड अंतर्गत विविध प्रशिक्षणे/कार्यशाळा/ बैठकी / चर्चासत्रे इ. कार्यक्रमासाठी आवश्यक जिल्हा व तालुका स्तरीय निवासी आणि अनिवासी प्रशिक्षण केंद्र व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठीएका वर्षासाठी सेवा पुरवठादार संस्था निवड करण्यासाठी निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचा मी / आम्ही पालन करेन. तसेच मंजूर झालेले दर हे करार कालावधी दरम्यान वैध राहतील.

मी / आम्ही असे घोषित करतो की मी कोणत्याही न्यायालयाच्या कायद्याव्दारे दोषी ठरवले नाही किंवा मी / आम्ही कोणत्याही राज्य सरकार किंवा केंद्र सरकार विभाग / केंद्रशासित प्रदेश / स्थानिक प्राधिकरण / केंद्र व राज्य सरकार यांच्याद्वारे मान्यताप्राप्त सरकारी संस्था द्वारे या निविदा प्रक्रियेत सहभागी होण्याच्या दिनांक पर्यंत काळी सूचीबद्ध केलेली नाही.

मी / आम्ही सहमत आहे की निविदा जारीकर्ता आमच्याकडे पुरविलेल्या माहितीची तपासणी/ सत्यापन करताना सादर करण्यात आलेली माहिती खोटी असल्याचे सिद्ध झाल्यास तसेच आमच्याद्वारे निविदा दस्तेवज मध्ये नमूद अटी आणि नियमांचे पालन करण्यात आले नाही तर बयाना रक्कम (Earnest Money Deposit) आणि कामगिरी सुरक्षा रक्कम /अनामत रक्कम (Performance Security Deposit) जप्त करेल आणि तीन (3) वर्षे कालावधी करिता मला /आम्हाला शासनाच्या काळ्या यादित समाविष्ट करेल.

दिनांक :-

शिक्का

निविदाधारकाची अधिकृत स्वाक्षरी

टीप: रु.५०० /- च्या गैर-न्यायिक मुद्रांक पेपर हा शासकीय नियमानुसार वैध्य असणे आवशक आहे अन्यथा निविदा नाकारण्यात येईल.